**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ सुदेश दत्ताराम मळीक यांचा उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. एस्. पी. देसाई यांचेकडून सुरु</u> –**

१३) माझ्या आधारकार्ड वर खोलपेवाडी, साळ, रा. गोवा येथील माझा राहता पत्ता आहे. तेथे माझे राहते घर असुन मी तेथील रहीवासी आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये माझा राहता पत्ता कसई, बाजारपेठ असा नमुद आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, मी गोवा राज्यात राहत असल्याने प्रतिज्ञापत्रातील माझा राहता पत्ता चुकीचा आहे. मी २०–२५ वर्षांपासून कापडाचा व्यवसाय करतो. माझा व्यवसाय चांगला चालतो. मी माझ्या व्यवसायाकरीता जी.एस.टी. क्रमांक प्राप्त करुन घेतलेला नाही. मी गेल्या २०–२५ वर्षांपासून कर भरणा करत आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, मी करपरतावा दाखल करताना त्यामध्ये मिळालेले उत्पन्न व झालेला तोटा याबाबत सर्विस्तर नमुद करतो. सन २०१९ चा मी आयकर परतावा दिलेला आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, त्या आयकर परताव्यामध्ये मी कोणालाही हातउसने स्वरुपात रोख रक्कम दिल्याचे नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही रोख रक्कम दिली नसल्याने मी तसा उल्लेख परताव्यामध्ये केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१९ मध्ये माझ्याकडे रक्कम रु. ५,६०,०००/– रोख स्वरुपात होते व त्याचा मी आयकर परतावा भरलेला नाही. असा परतावा भरल्याबाबतचे कागदपत्र मी या कामी १५–२० दिवसांत हजर करु शकतो.

१४) हे म्हणणे खरे नाही की, मी एखादया व्यक्तीस काही रक्कम दिल्यास त्याबाबतची पावती व सही घेतो. हे म्हणणे बरोबर आहे की, रक्कम रु. २०,०००/- पेक्षा अधिकचा व्यवहार रोख स्वरुपात कायदेशीर करता येत नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, मला आरोपीस पैसे द्यायचे असल्यास माझ्या बँक खात्यातुन आरोपीचया बँक खात्यात जमा करणे शक्य होते. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१९ मध्ये अशी कोणतीही रक्कम माझ्या खात्यातुन आरोपीच्या खात्यात गेली असे घडले नाही. सन २०१९ मध्ये मला रक्कम रु. ५,६०,०००/- कोणा कोणा कडुन कशा पद्धतीने प्राप्त झाले हे सांगता येईल. सन २०१८ मध्ये मी ग्रामीण रुग्णालय, दोडामार्ग समोरील माझी जमीन विकली असल्याने तसेच मी व्यवसायीक असल्याने माझ्याकडे तेवढी रक्कम रोख स्वरुपात होती. मी विकलेली जमीन स.क्र.२२०/२क मधील १६ गुंठयाची जमीन होती. मी किरण शिरोडकर या व्यक्तीला ती जमीन रक्कम रु.२२,००,०००/- ला विकली. त्या व्यवहाराची खरेदीखताची प्रत मी या कामी हजर करु शकतो. हे म्हणणे बरोबर आहे की, त्या खरेदीखतामध्ये मला रोख स्वरुपात ५,६०,०००/- रुपये मिळाल्याबाबत नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, कायद्याने व्यवहार संपुर्ण खरेदीखतामध्ये नमुद करणे गरजेचे असते. हे म्हणणे खरे नाही की, मला त्या व्यवहारात मिळालेली रक्कम माझ्या खात्यातून काढली नाही. त्या खरेदीखताची तारीख मला आता आठवत नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, मी देणार व किरण शिरोडकर घेणार अशा आशयाचे त्या मिळकतीचे एकच खरेदीखत दोडामार्ग दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीकृत आहे.

१५) माझ्या म्हणण्याप्रमाणे मी आरोपीला रक्कम रु. ५,६०,०००/- देताना समोर कोणीही नव्हते. तेवढी रक्कम आरोपी मला तीन वर्षात परत करेल अशा स्वरुपाचा कोणताही करार किंवा पावती माझ्याकडे नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, आरोपी कसई मधील रहीवासी असुन तो माझ्या चांगल्या ओळखीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी त्याचे चेकबुक वगैरे कधीकधी माझ्या दुकानामध्ये ठेऊन जातो. माझ्या म्हणण्याप्रमाणे दि.१५.०८.२०१९ रोजी मी आरोपीला रक्कम रु. ५,६०,०००/- दिले. हे म्हणणे बरोबर आहे की, दि.१५.०८.२०१९ पासून तीन वर्ष दि.१५.०८.२०२२ रोजी पुर्ण होतात. दि.१५.०८.२०२२ च्या दरम्यान मी आरोपी कडुन रक्कम परत मिळणेकरीता नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.१५.०८.२०१९ रोजी आरोपीने माझ्याकडुन कोणतीही रक्कम न घेतल्यानेच मी आरोपीला अशी कोणतीही नोटीस पाठविली नाही. आता मला नि.क्र.C1/CW-1 व नि.क्र.C2/CW-1 वरील दोन्ही धनादेश दाखविण्यात आले. त्यावरील सही सारखी असल्याचे दिसुन येते. आता मला नि.क्र.C7/CW-1 वरील पोष्टाची पोच पावती दाखविण्यात आली. हे म्हणणे बरोबर आहे की, चेकवरील सही व पोष्टाची पोच पावतीवरील सही वेगवेगळी आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.C1/CW-1,नि.क्र.C2/CW-1 व नि.क्र.C7/CW-1 वरील सह्या आरोपीच्या नाहीत. हे म्हणणे बरोबर आहे की, मी दाखल केलेले नि.क्र.C3/CW-1 व नि.क्र.C4/CW-1 वर बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेचा शिक्का नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, नि.क्र.C3/CW-1 व नि.क्र.C4/CW-1 वरील

चेक रिटर्न मेमोवर ब्रँच सावंतवाडी असे नमुद केलेले आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, या दोन्ही चेक रिटर्न मेमोवर बँक ऑफ महाराष्ट्र शाखा दोडामार्ग असे कुठेही नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे चेक रिटर्न मेमो तयार करुन खोटी केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, चेक डिपॉझीटची स्लीप मला या कामी हजर करण्यास कोणतीही अडचण नव्हती व तशी कोणतीही स्लीप मी याकामी हजर केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा आधारकार्ड वरील रहीवासाचा पत्ता खोळपेवाडी, साळ, गोवा येथील आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीस चुकीच्या पत्त्यावर नोटीस पाठवुन खोटी केस दाखल केलेली आहे.

१६) हे म्हणणे खरे नाही की, मी दि.१५.०८.२०१९ रोजी आरोपीस रक्कम रु. ५,६०,०००/– दिले व ती रक्कम आरोपी मला ०३ वर्षात परत करेल असे त्याने कबुल केले, हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला दि.१३.०७.२०२३ रोजीचा रक्कम रु.५,००,०००/– चा चेक व दि.२७.०६.२०२३ रोजीचा रक्कम रु.६०,०००/– चा चेक असे दोन चेक दिल्याबाबत मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तसेच दोन्ही चेक मी दि.०८.०८.२०२३ रोजी बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा कसई, दोडामार्ग येथे सादर केले असुन दि.०९.०८.२०२३ रोजी Funds Insufficient या शेऱ्याच्या चेक रिटर्न मेमोसह परत आले असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.३१.०८.२०२३ रोजी मी आरोपीला नोटीस पाठविली व ती नोटीस

दि.०२.०९.२०२३ रोजी आरोपीस पोच झाली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेले चेक, रिटर्न मेमो व पोस्टाच्या पावत्या मी स्वतः तयार केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, या कागदपत्रांशी आरोपीचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपास व फिर्यादीतील संपुर्ण मजकुर खोटा आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2025.12.03 13:02:49 +0530

ठिकाणः– दोडामार्ग. (वाय. पी. बावकर)
दिनांकः– ०३/१२/२०२५. न्यायदंडाधिकारी वर्ग–१, दोडामार्ग.